नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ९० Issue - 90 | वार - सोमवार दि. २४ ऑगस्ट २०२६ Blow- Monday Date 24 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## महाराष्ट्राची परंपरा लाभलेल्या ढोल ताशाला जागतिक नामांकन

### इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जागतिक विक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : शिक्षण कौशल्य, क्रीडा स्टार्टअप आदी क्षेत्रात युवा पिढीचा सकारात्मक सहभाग आहे. त्यांचा हा सहभाग वाढविण्यासोबतच संपूर्ण मदत देण्यात येईल त्यासोबत स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये चर्चा करून चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी दिली. रेशीमबाग मैदानावर मंथन फॉर युवा या उपक्रमांतर्गत ढोल ताशा पथकाचा जागतिक विक्रम तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन असलेल्या व्यक्तींसोबत थेट संवाद, नशामुक्त महाराष्ट्र व देश यासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५ हजार पेक्षा जास्त युवक व युवती सहभागी झाल्या होत्या.



महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोल ताशा पथकाने इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या मध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे. आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांच्या या उपक्रमामुळे जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल संपूर्ण चमुचे अभिनंदन केले. २५ हजार पेक्षा जास्त युवकांच्या साक्षीने हा उपक्रम पूर्ण झाला असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजची युवा पिढी सर्वच क्षेत्रात आपल्या कौशल्याने नावलौकिक मिळवित आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सर्वाधिक सहभाग लाभलेल्या ध्वजधारकांच्या समावेशाबद्दल विश्वविक्रमामध्ये नोंद झाली असून यापूर्वी २६० ध्वज धारकांचा समावेश असलेला विक्रम आज मोडीत निघाला आहे. सुप्रसिद्ध क्रीडा समालोचक रिधिमा पाठक यांनी युवकांचे आयकॉन असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच क्रिकेटपटू तिलक वर्मा, राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक विजेते दिलीप महादू गावित, अर्जुन देशपांडे, किरण शहाजी यांचे सोबत संवाद साधताना विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्याची प्रेरणा व अनुभव युवकांसमोर शेअर केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की संविधानामुळेच लोकशाही प्रगल्भ झाली आहे. आपल्या लोकशाहीमुळेच मला नगरसेवक, महापौर, आमदार आणि मुख्यमंत्री या पदापर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. आपल्या आकांक्षा व विश्वास पूर्ण करण्यासाठी संविधानामुळेच कुणीही थांबू शकत नाही असे सांगत त्यांनी आपल्या राजकीय व सामाजिक वाटचालीची माहिती युवकांसमोर मांडली. स्टार्टअप संदर्भात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, युवकांना शासनाची संपूर्ण मदत करण्याचे धोरण असून स्टार्टअपसाठी इकोसिस्टीम पॉलिसी तयार करण्यात आली आहे. या धोरणामध्ये युवकांना शंभर टक्के मदत करण्याचा उद्देश असल्याने युवकांसोबत चर्चा करून आणखी चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल असा विश्वास यावेळी त्यांनी दिला. मुलांमध्ये असलेल्या सर्वाधिक स्क्रीन टाईम बद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, मुलांचा स्क्रीन टाईम कमी करण्यासाठी विचारमंथन सुरू आहे. स्क्रीनवरून मैदानावर कसे वळता येईल याबद्दलही या क्षेत्रातील तज्ञांकडून निश्चित धोरण ठरविण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. प्रारंभी मंथन फॉर युवाचे आयोजक रितेश गावंडे यांनी स्वागत करून या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. १ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट पर्यंत या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले असून या उपक्रमातील यशस्वी स्पर्धकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन म्हणून आेळख असलेल्या युवक व युवतींचा गौरव करून त्यांच्या विविध क्षेत्रातील कार्याची माहिती देण्यात आली. नशा मुक्त भारत या अंतर्गत युवकांना नशा मुक्तीची शपथ देण्यात आली. यामध्ये अमली पदार्थ मुक्त जीवनशैली, व्यसनापासून दूर राहण्याची प्रतिज्ञा त्यासोबतच अमली पदार्थांचा वापर अथवा विक्री कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. तसेच आपली अमली पदार्थ मुक्त युवा पिढी घडविण्यासाठी सक्रिय सहभाग याबद्दल युवकांना पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी शपथ दिली.

## पुढील दोन दिवसात राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. अनेक भागात सध्या पावसानं दडी मारल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसले आहेत. पाण्यावाचून शेती पिकं जळू लागली आहे. अशा स्थितीत पुढील दिवस राज्यातील हवामान कसं असेल? कुठं कुठं पाऊस पडेल यासंदर्भात महत्वाची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन दिवस राज्यातील काही भागांत हलका ते मध्यम, तर काही ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषतः कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांत पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे.



हवामान विभागाच्या अंदाजानुसार २४ ऑगस्ट रोजी कोकण-गोवा परिसरातील बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण-गोवा या भागात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत पावसाची शक्यता आहे. तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस किंवा मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांत इतर भागांच्या तुलनेत पाऊस अधिक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी स्थानिक हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन आवश्यक नियोजन करावे.

विदर्भातील अमरावती जिल्ह्यात २५ २६ २७ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर यवतमाळ अकोला या जिल्ह्यात जोरदात पाऊस पडणार आहे. बुलढाणा तसेच हिंगोली वाशिममध्ये दखील दिलासादायक पाऊस पडले असे डख म्हणाले. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात देखील चांगला पाऊस पडणार असल्याचे डख म्हणाले.

मराठवाड्यातही पावसाची शक्यता


लातूर, परभणी, जालना, बीड या जिल्ह्यात देखील विखुरलेल्या स्वरुपात पाऊस डणार असल्याचे डख म्हणाले. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला पंढरपूर भागात पावसाची शक्यता डखांनी वर्तवली आहे. अहिल्यानंगरमध्येही पावसाची शक्यता आहे. कोकणपट्यात राधानगरी पुणे या भागात पावसाची शक्यता असल्याचे डख म्हणाले. नाशिकच्या काही भागात देखील पावसाची शक्यता आहे. धुळे नंदूरबारमध्ये २६ २७ आणि २८ ऑगस्टला पाऊस पडणार असल्याचे डख म्हणाले.

## धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करणार

मुंबई : राज्यभरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांची सोय व्हावी आणि त्यांना अधिक चांगल्या सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना मदत करणाऱ्या विविध धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मोठ्या रुग्णालयांमध्ये दररोज हजारो रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपचारासाठी येत असतात.

बऱ्याचदा उपचाराचा मोठा खर्च, राहण्याची आणि जेवणाची सोय तसेच योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. हीच बाब लक्षात घेऊन या सर्व घटकांना एकाच छताखाली आणून एक सुटसुटीत आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

करारामुळे धर्मादाय रुग्णालये आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मिळणारी मदत थेट आणि वेळेत रुग्णांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचवणे शक्य होणार आहे. धर्मादाय आयुक्तांच्या नियंत्रणाखाली असलेल्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांवर मोफत आणि सवलतीच्या दरात उपचार केले जातात. या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची (पान २ वर....)




## १९ व्या शतकानंतर सर्वात शक्तिशाली एल निनोमुळे पृथ्वीचं तापमान वाढणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सध्या जगभरातील वातावरणात झपाट्यानं बदल होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यावर्षी एल निनो सक्रिय झाल्यामुळं मोठ्या प्रमाणात पावसात तूट झाली आहे. अने भागात पावसानं दडी मारल्यामुळं पिण्याच्या पाण्याचा, शेतीच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, पॅसिफिक महासागरात तयार होणारी एल निनोची यावेळी अत्यंत शक्तिशाली असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार, याचा परिणाम जागतिक तापमान, पर्जन्यमान आणि हवामानावर होईल. यामुळं २०२६-२७ हे वर्ष उष्णतेचे नवीन विक्रम प्रस्थापित करण्याची शक्यता वर्तवली आहे,

यावर्षी जगाला पुन्हा एकदा मोठ्या उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागू शकतो. हवामानशास्त्रज्ञांच्या मते, पॅसिफिक महासागरात विकसित होणारी एल निनोची घटना यावेळी खूप तीव्र असू शकते, इतकी की ती १९ व्या शतकानंतरची सर्वात शक्तिशाली एल निनो घटना ठरु शकते. यामुळे जागतिक सरासरी तापमानात आणखी वाढ होऊ शकते, ज्यामुळे २०२६ किंवा २०२७ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष ठरु शकते. दरम्यान, एल निनोच्या परिस्थिती नेमकं काय होतं? असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे. या काळात, पूर्व पॅसिफिक महासागरातील समुद्राचे पाणी सामान्यपेक्षा जास्त उष्ण होते.

### नागपुरात मंथन फॉर युवा या कार्यक्रमातून जेन झी तरुणांशी संवाद

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

## भारताचे संविधान आणि लोकशाही प्रत्येक व्यक्तीला मोठी संधी देऊ शकते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : तरुणांना मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान होण्याची इच्छा असणे ही सकारात्मक बाब आहे. यातून भारतीय लोकशाहीची ताकद अधोरेखित होते. आपल्या राजकीय प्रवासाकडे पाहताना मुख्यमंत्री होऊ, असा विचार सुरुवातीला कधीच केला नव्हता. राजकारणात प्रवेश केला त्यावेळी सत्ता मिळेल, अशी अपेक्षा नव्हती. विरोधी पक्षात राहून आंदोलन आणि संघर्ष करण्यासाठीच राजकारणात आलो होतो. मात्र आपला प्रवास नगरसेवकापासून मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचला. त्यामुळे भारताचे संविधान आणि लोकशाही प्रत्येक व्यक्तीला मोठी संधी देऊ शकते, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांनी व्यक्त केला. मनात ठाम ध्येय असेल आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, तर कोणतीही व्यक्ती सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकते, असे फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपुरात मंथन फॉर युवा या कार्यक्रमातून जेन झी तरुणांशी संवाद साधला. यात त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाबद्दल भाष्य केले. यासह यशानंतर येणाऱ्या दबावावरही भाष्य केले. मोठ्या पदावर पोहोचल्यानंतर जबाबदाऱ्या वाढतात आणि त्यासोबत मानसिक दबावही निर्माण होतो. मात्र, हा दबाव कसा हाताळायचा, याबाबत फडणवीसांनी त्यांच्या आयुष्यातील काही प्रसंग सांगितले. नागपुरात कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस प्रसारमाध्यमासोबत बोलत होते.



या कार्यक्रमात ४१०० मुलांमुलींनी ढोल ताशा वादनाचा विक्रम केला. जेन झी यांना दिशा दाखवणारा हा कार्यक्रम होता. गेले काही दिवस मंथन फॉर युवाच्या माध्यमातून दीड लाख तरुणांनी भाग घेतला. आजही रेशीमबाग मैदानावर २० ते २५ हजार तरुण तरुणी उपस्थित होत्या. वेगवेगळ्या क्षेत्रात मुलांची स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा कार्यक्रम होता, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

दबावाबाबत बोलताना त्यांनी राजकारणाला व्यवसाय मानत नसल्याचे स्पष्ट केले. सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणण्याचे राजकारण हे प्रभावी माध्यम असल्यामुळे आपण या क्षेत्रात आलो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थी जीवनातील संघर्षाचाही त्यांनी उल्लेख केला. तरुण वयात आंदोलनांमध्ये सहभागी होताना अटक, पोलिसांचा सामना आणि तुरुंगवासाचा अनुभव आल्याचेही त्यांनी सांगितले. या संघर्षामुळे कठीण परिस्थितीचा सामना करण्याची मानसिक तयारी निर्माण झाली, असे त्यांनी नमूद केले. यश मिळाल्यानंतर येणारा दबाव वेगळा असला तरी संघर्षाच्या काळातच त्याला सामोरे जाण्याची मानसिकता तयार होते, असा संदेश फडणवीसांनी यावेळी तरुणांना दिला. ध्येय मोठे ठेवण्यासोबतच त्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पुण्यातील 'छात्रो की गुंज' या कार्यक्रमाला महिला, विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यांनी या कार्यक्रमातून महिला व विद्यार्थिनींच्या अधिकारावर भाष्य केले. मात्र याला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे असल्याचा आरोप केला. पुण्यातील कार्यक्रमात राहुल गांधी महिला अधिकारावर बोलले, परंतु याच राहुल गांधी यांनी महिला आरक्षणाला विरोध केला. त्यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहे. काँग्रेस दिशाहीन पक्ष असून केवळ बोल बच्चन करणारे नेते आहे. या पक्षाची जमिनीपासून नाळ तुटली आहे, अशी टीकाही त्यांनी केली. यावेळी फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या कार्यक्रमात आलेले आदिवासी विद्यार्थी नेते कुठल्या पक्षाचे होते, तेही बघावे, असे मत व्यक्त केले. आदिवासी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सरकार जेवढ्या योजनाचा लाभ देते, तेवढे कोणतेही राज्य देत नाही. वसतिगृहात जागा न मिळालेल्या २० हजार विद्यार्थ्यांना प्रत्येकी ६० हजार रुपये देण्यात येत आहे. तरुणाईला दिशा देण्यासाठी अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### जागतिक विक्रम

महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोल ताशा पथकाने इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या मध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे. आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांच्या या उपक्रमामुळे जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल संपूर्ण चमुचे अभिनंदन केले. २५ हजार पेक्षा जास्त युवकांच्या साक्षीने हा उपक्रम पूर्ण झाला असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजची युवा पिढी सर्वच क्षेत्रात आपल्या कौशल्याने नावलौकिक मिळवित आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सर्वाधिक सहभाग लाभलेल्या ध्वजधारकांच्या समावेशाबद्दल विश्वविक्रमामध्ये नोंद झाली असून यापूर्वी २६० ध्वज धारकांचा समावेश असलेला विक्रम आज मोडीत निघाला आहे. सुप्रसिद्ध क्रीडा समालोचक रिधिमा पाठक यांनी युवकांचे आयकॉन असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच क्रिकेटपटू तिलक वर्मा, राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक विजेते दिलीप महादू गावित, अर्जुन देशपांडे, किरण शहाजी यांचे सोबत संवाद साधताना विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्याची प्रेरणा व अनुभव युवकांसमोर शेअर केले. रेशीमबाग मैदानावर मंथन फॉर युवा या उपक्रमांतर्गत ढोल ताशा पथकाचा जागतिक विक्रम तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन असलेल्या व्यक्तींसोबत थेट संवाद, नशामुक्त महाराष्ट्र व देश यासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५ हजार पेक्षा जास्त युवक व युवती सहभागी झाल्या होत्या. संविधानामुळेच लोकशाही प्रगल्भ झाली आहे. आपल्या लोकशाहीमुळेच मला नगरसेवक, महापौर, आमदार आणि मुख्यमंत्री या पदापर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. आपल्या आकांक्षा व विश्वास पूर्ण करण्यासाठी संविधानामुळेच कुणीही थांबू शकत नाही.

## धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करणार

(पान १ वरून..)

यंत्रणा जोडली जाणार आहे. रुग्णालयांच्या परिसरात नातेवाईकांसाठी निवारा, अल्पदरात, मोफत भोजन आणि वैद्यकीय मार्गदर्शनाची सोय अधिक प्रभावीपणे केली जाईल. सर्वसामान्यांना आरोग्य सेवा मिळवताना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि त्यांना प्रशासकीय प्रक्रियेत सुलभता मिळवून देणे हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश आहे. यामुळे राज्यातील हजारो गरीब आणि गरजू रुग्णांना व त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. करारामुळे धर्मादाय संस्थांचे योगदान आणि शासकीय यंत्रणांची कार्यक्षमता एकत्र येऊन एक आदर्श आरोग्य सहाय्य मॉडेल राज्यात उभे राहील. अशा धर्मादाय न्यासांच्या सहकार्याने विविध 'त्रिपक्षीय सामंजस्य करार' करण्यात येऊन त्याचा थेट लाभ रुग्णांना देणे शक्य होणार आहे. त्यासाठी सीएमआरएफच्या वेबसाईटवर सर्व तपशील उपलब्ध आहे. त्यात सर्व संस्थानी सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## (२४ ऑगस्ट: भागवत वा वैष्णव एकादशी विशेष. )

# भागवत एकादशी : पापक्षालक आणि आत्मशुद्धी व्रत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हिंदू पंचांगानुसार प्रत्येक महिन्यातील दोन्ही पक्ष- शुक्ल व कृष्ण पक्षांमधील अकराव्या तिथीला एकादशी म्हणतात. जेव्हा एकादशीची तिथी दोन दिवस येते, तेव्हा पहिल्या दिवसाच्या एकादशीला स्मार्त एकादशी आणि दुसऱ्या दिवसाच्या एकादशीला भागवत एकादशी वा वैष्णव एकादशी म्हटले जाते. वारकरी संप्रदायात भागवत एकादशीचे व्रत अत्यंत भक्तीभावाने पाळले जाते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर माहितीपूर्ण संकलित लेख चोखंदळ वाचकांना समर्पित... संपादक.

भगवान विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी भागवत एकादशी व्रत केले जाते. वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णु भक्त तसेच विठ्ठल भक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसर्या दिवशी उपवास सोडला जातो. भागवत एकादशी हे हिंदू धर्मातील अत्यंत महत्त्वपूर्ण व्रत आहे. प्रत्येक एकादशीला व्रत ठेवणे हे मनुष्याच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक मानले जाते, पण त्यातील भागवत एकादशी विशेष महत्त्वाची आहे. या एकादशीला श्रीविष्णूच्या भगवद्गीतेचे वाचन, व्रत, उपवास आणि विविध धार्मिक कृत्ये केली जातात. याचे धार्मिक, आध्यात्मिक आणि पारंपरिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. भागवत एकादशीचे व्रत हे त्याग, तपस्या आणि भक्तिरूपी पवित्रता साधण्यासाठी महत्त्वाचे ठरते. भागवत एकादशीला श्रीविष्णूच्या आशीर्वादाने पापांचे नाश होते, आणि भक्ताच्या जीवनात सुख, समृद्धी आणि शांती येते. या दिवशी भक्त श्रीविष्णूची पूजा करून, त्याच्या व्रताने सामर्थ्य मिळवण्यासाठी प्रार्थना करतात.

द्वादशीच्या म्हणजे एकादशीनंतर एकदाच उपवास करणारा साधक आपले पापक्षालन करतो आणि आपल्या आत्म्याची शुद्धता साधतो. भागवत एकादशीच्या दिनी विशिष्ट व्रत आणि पूजा पाठ करणे, हे भक्तांचे पुण्य वाढवते आणि प्रत्येक व्रताद्वारे उपास्यदेवतेशी जुळवून घेतले जाते. यामुळे भक्तांच्या जीवनात आंतरिक शांती आणि आत्मविश्वास निर्माण होतो. आध्यात्मिक महत्त्व: एकादशीचे व्रत भक्तांना आत्मसाक्षात्काराच्या दिशेने मार्गदर्शन करते. व्रत ठेवताना आणि श्रीविष्णूची प्रार्थना करतांना भक्त आंतरिक शांती आणि परिपूर्णता अनुभवतात. हे व्रत त्यांच्या मनाच्या शुद्धतेसाठी महत्त्वपूर्ण आहे, कारण ते त्यांना अनावश्यक चंचलतेपासून मुक्त करते आणि ध्यान करण्यासाठी योग्य वातावरण तयार करते. भागवत एकादशीचे व्रत ठेवणे म्हणजे एका दिवसासाठी दुनियेच्या सर्व विषयांचा त्याग करणे आणि फक्त भगवान श्रीविष्णूच्या ध्यानात रममाण राहणे, होय. पारंपरिक महत्त्व: भारतामध्ये प्रत्येक एकादशीला विशेष धार्मिक महत्त्व आहे, पण भागवत एकादशीला विशेष पारंपरिक उत्सव म्हणून मानले जाते. कुटुंबाच्या प्रत्येक सदस्याने या दिवशी व्रत ठेवणे आणि श्रीविष्णूची पूजा करणे हे एक पारंपरिक कर्तव्य मानले जाते. या दिवशी अनेक भक्त मंदिरांमध्ये जाऊन श्रीविष्णूची पूजा करतात, व्रत घेतात आणि विशेष प्रसाद ग्रहण करतात. या दिवशी विशेषतः भगवान श्रीविष्णूला अर्पण केलेले नैवेद्य, हळदीकुंकू, पुष्पहार आणि भव्य पूजा व सामूहिक व्रत पूजा या सर्वांची विशेष महत्ता आहे.



जसे आपण भागवत एकादशीचे धार्मिक व अध्यात्मिक महत्त्व समजून घेतले तसेच या दिवसाचे सामाजिक महत्त्व जाणून घेणे व ते अंमलात आणणे, हे आपले कर्तव्य आहे. जसे आपण भगवान विष्णूंची पूजा अर्चा करून आपल्यासाठी पाप नाशनाची प्रार्थना करतो, तसे सामाजिक कार्याला या दिवशी उचित हातभार लावून आपण बरेच पुण्य कमवू शकतो. भगवान विष्णूंच्या नावावर आधारित हि संस्था म्हणजेच नारायण सेवा संस्था हि तुम्हाला या कार्यात योग्य ती मदत करू शकते. नारायण सेवा संस्थान ही एक समाजसेवी संस्था आहे जी समाजातील वंचित घटक व अपंगांसाठी काम करते.

या संस्थेने आपल्या सामाजिक कार्याने, शारीरिक व मानसिक त्रास असलेल्या व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी विविध सेवा सुरू केल्या आहेत. याच कार्यासाठी अश्या पवित्र दिवशी केलेलं दान हे उचित फल प्राप्तीसाठी योग्य ठरू शकतं. तर मग अश्या दिवशी तुम्ही जर या संस्थेद्वारे दान केलं तर तुमचा पवित्र व्रतविधी अजून समृद्ध होईल आणि तुमच्या जीवनात श्रीविष्णूच्या आशीर्वादाने शांती व आनंद यायला मदत होईल. निष्कर्ष: भागवत एकादशीचे व्रत धार्मिक, आध्यात्मिक आणि पारंपरिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. हे व्रत भक्तांना त्यांच्या जीवनातील पापांची शुद्धता साधण्यास, आत्मसाक्षात्कार साधण्यास, आणि शांतीचा अनुभव घेण्यास मदत करते. याप्रमाणे, नारायण सेवा संस्थान आपल्याला आपल्या दानाच्या माध्यमातून समाजातील गरजू लोकांसाठी मदत करण्याची संधी देते.

हिंदू धर्मातील एकादशी व्रतांना अत्यंत पवित्र मानले जाते आणि त्यामध्येही भागवत एकादशी विशेष महत्त्वाची आहे. आषाढ शुक्ल एकादशीला साजरी होणारी ही एकादशी भगवान श्रीविष्णू व त्यांच्या अवतार श्रीकृष्णाच्या भक्तीला समर्पित असते. याला ''पद्मा एकादशी'' किंवा ''आषाढी एकादशी'' असेही म्हणतात. हा दिवस उपवास, पूजन, भजन-कीर्तन, श्रीमद्भागवत पाठ आणि दानधर्माने भरलेला असतो. वारकरी संप्रदायासाठी तर भागवत एकादशी हा अत्यंत भक्तीचा तसेच आनंदाचा दिवस असतो. पंढरपूरच्या विठोबा रुख्मिणी मंदिरात लाखो भाविकांची वारी होते. या दिवशी केलेला उपवास आणि भक्ति आराधना, जीवनातील पापांचे क्षालन करून मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवतो, असे मानले जाते. यात भागवत एकादशीचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व, व्रत करण्याची पद्धत, विशेष परंपरा, तसेच विविध तीर्थक्षेत्रांतील साजरा होणारा उत्सव. जर तुम्हाला अध्यात्मात रस असेल तर हा दिवस भक्तीमयतेने अनुभवण्यास विसरू नका! वारकरी संप्रदायामध्ये परंपरेने भागवत एकादशी साजरी केली जाते. या एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुंची पूजा करून विष्णू भक्त दिवसभर उपवास करतात. भागवत एकादशी व्रत हे पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते. या व्रताच्या प्रभावामुळे मोक्ष प्राप्ती होते. या व्रतामुळे अश्वमेध यज्ञ, घोर तपस्या, तीर्थ स्नान व दान या सर्वांपासून मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही जास्त पुण्य मिळते, असे पौराणिक कथेत म्हटले आहे. वारकरी संप्रादयामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात- कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा व आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात- पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार, एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात.

पूजाविधी: भागवत एकादशीच्या दिवशी पहाटे उठून अंघोळ करुन चांगले कपडे परिधान करतात. नंतर पूजा करण्यासाठी एक चौरंग तयार करतात. चौरंगावर पिवळ्या रंगाच्या वस्त्रावर विष्णू देवाची मूर्ती किंवा फोटो ठेवतात. विष्णू देवाची फळं-फुलं, नारळ, पान-सुपारीने पूजा करतात. पूजेनंतर विष्णू देवाची आरती करुन विष्णू देवाला नैवेद्य अर्पण करतात. एकादशी व्रत केल्यास भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मीची कृपा प्राप्त होते. यासोबतच घरात सुख-समृद्धी नांदते. एकादशीच्या दिवशी विष्णूंची पूजा केल्याने अधिक फलप्राप्ती होते. भक्तांवर श्रीहरी-विष्णूंची कृपा कायम राहते. लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो आणि धन-संपत्तीत वाढ होते. (टीप : वरील सर्व बाबी केवळ माहिती म्हणून वाचक-भाविकांपर्यंत पोहोचवत आहे. यातून आपण कोणताही दावा करत नाही किंवा आपला अंधश्रद्धेच्या प्रसार-प्रचाराचा कुठलाच हेतू नाही जी! विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !!)

– संकलन व सुलेखन –

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.

राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

फक्त मधुभाष: ९६९९८३६७१७.

# सोशल मीडियावर सक्रिय आहात; पण सोशल आहात का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाइल आपल्या हातात असतो. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सप, एक्स यांसारख्या माध्यमांवर आपण मित्र, नातेवाईक, सहकारी आणि जगभरातील असंख्य लोकांशी जोडलेले असतो. आपल्या आयुष्यातील घटना, विचार, छायाचित्रे, भावना आणि मतं काही क्षणांत हजारो लोकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे आपण स्वतःला 'सोशल' समजू लागतो. मात्र एक साधा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे- आपण सोशल मीडियावर आहोत; पण खरंच सोशल आहोत का?

सोशल मीडियावर असणं आणि सोशल असणं यात मूलभूत फरक आहे. सोशल मीडियावर असणं म्हणजे डिजिटल जगात आपली उपस्थिती असणं. पोस्ट करणं, प्रतिक्रिया देणं, लाईक करणं, शेअर करणं, फॉलो करणं आणि संदेश पाठवणं हा त्याचा भाग आहे. पण सोशल असणं म्हणजे माणसांशी प्रत्यक्ष जोडलेलं असणं. कोणाच्या अडचणीच्या वेळी त्याच्यासोबत उभं राहणं, एखाद्याचं म्हणणं शांतपणे ऐकून घेणं, गरजूंना मदत करणं, शेजाऱ्याची चौकशी करणं, ज्येष्ठांना वेळ देणं आणि समाजातील प्रश्नांबाबत संवेदनशील राहणं ही खरी सामाजिकता आहे.

आज आपल्या मोबाइलमध्ये शेकडो किंवा हजारो संपर्क असतात; पण प्रत्यक्ष आयुष्यात मनापासून संवाद साधता येईल अशी माणसं किती आहेत, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कुटुंबातील सदस्य एकाच घरात असतात, पण प्रत्येकजण वेगवेगळ्या स्क्रीनमध्ये गुंतलेला असतो. जेवणाच्या टेबलावर संवादापेक्षा मोबाइल अधिक महत्त्वाचा ठरतो. मित्रांच्या समूहात बसूनही प्रत्येकाचं लक्ष आपल्या मोबाइलकडे असतं. संवादाची साधनं वाढली; पण संवादासाठी लागणारा वेळ आणि संयम कमी होताना दिसतो.

सोशल मीडिया मात्र दोषी नाही. उलट तो समाजाला जोडण्याचं प्रभावी माध्यम ठरू शकतो. आपत्तीच्या काळात मदतीची माहिती पोहोचवणं, रक्ताची गरज असलेल्या व्यक्तीपर्यंत संदेश पोहोचवणं, शैक्षणिक संधींची माहिती देणं, सामाजिक उपक्रमांसाठी लोकांना एकत्र आणणं किंवा एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर जनजागृती करणं यासाठी सोशल मीडिया अत्यंत उपयुक्त आहे. प्रश्न आहे तो आपण त्याचा वापर केवळ स्वतःचं प्रदर्शन करण्यासाठी करतो की समाजाशी जोडण्यासाठी करतो, याचा.



एखाद्या सामाजिक प्रश्नावर पोस्ट लिहिणं सोपं आहे; पण त्या प्रश्नासाठी प्रत्यक्ष वेळ देणं कठीण आहे. पर्यावरणाच्या संरक्षणावर संदेश शेअर करणं सोपं आहे; पण झाड लावून त्याची काळजी घेणं अधिक महत्त्वाचं आहे. विद्यार्थ्यांच्या समस्यांवर चर्चा करणं सोपं आहे; पण एखाद्या विद्यार्थ्याला प्रत्यक्ष मार्गदर्शन करणं अधिक अर्थपूर्ण आहे. वृद्धांच्या समस्यांवर संवेदना व्यक्त करणं सोपं आहे; पण एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीला वेळ देणं ही खरी सामाजिक कृती आहे.

आज 'लाईक' आणि 'शेअर' यांना सामाजिक सहभाग समजण्याची प्रवृत्ती वाढत आहे. एखाद्या पोस्टला हजारो लाईक्स मिळाले म्हणजे त्या विचाराला समाजात खोलवर स्वीकार मिळाला असे मानता येत नाही. त्याचप्रमाणे एखादा सामाजिक उपक्रम सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेत आला म्हणजे प्रत्यक्ष बदल घडला असेही नाही. डिजिटल प्रतिसाद आणि प्रत्यक्ष सामाजिक परिणाम यांच्यात अंतर असू शकतं.

खरी सामाजिकता कृतीतून दिसते.

एखादा कामगार आपलं काम प्रामाणिकपणे करत असेल तर त्याच्या श्रमाचा आदर करणं, एखादा शेतकरी अडचणीत असेल तर त्याचा प्रश्न समजून घेणं, विद्यार्थ्याला शिक्षणासाठी मदत करणं, महिलांच्या सुरक्षिततेबाबत जागरूक राहणं, सार्वजनिक ठिकाण स्वच्छ ठेवणं, वाहतुकीचे नियम पाळणं, गरजू व्यक्तीला योग्य वेळी मदत करणं-या छोट्या वाटणाऱ्या कृती समाजजीवनाला अर्थ देतात. समाज बदलण्यासाठी नेहमी मोठ्या चळवळींची गरज नसते; जबाबदार नागरिकांच्या छोट्या कृतींची सातत्यपूर्ण साखळीही मोठा बदल घडवू शकते.

तरुण पिढीच्या बाबतीत हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. डिजिटल जग त्यांच्या शिक्षणाचा, करिअरचा आणि संवादाचा महत्त्वाचा भाग आहे. सोशल मीडिया त्यांच्यासाठी ज्ञान, संधी आणि नेटवर्किंगचं प्रभावी माध्यम ठरू शकतो. मात्र डिजिटल जगासोबत प्रत्यक्ष जगाशी नातंही मजबूत राहणं आवश्यक आहे. खेळ, वाचन, प्रत्यक्ष संवाद, सामाजिक उपक्रम, स्वयंसेवा आणि विविध प्रकारच्या लोकांशी संपर्क यामुळे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होतं.

सोशल असणं म्हणजे प्रत्येकाशी सहमत असणंही नाही. मतभेद असतील, विचार वेगळे असतील, राजकीय किंवा सामाजिक दृष्टिकोन भिन्न असतील तरी संवादाची दारे खुली ठेवणं ही सामाजिक परिपक्वता आहे. सोशल मीडियावर मतभेद अनेकदा वैयक्तिक टीका, अपमान आणि द्वेषात बदलतात. एखाद्याच्या मताशी असहमती असणं स्वाभाविक आहे; पण व्यक्तीचा आदर राखून मत मांडणं ही जबाबदार सामाजिकतेची खूण आहे.

डिजिटल जगात आपली ओळख निर्माण करणं महत्त्वाचं आहे; पण प्रत्यक्ष जीवनात विश्वास निर्माण करणं त्याहून महत्त्वाचं आहे. हजारो फॉलोअर्स असणं लोकप्रियतेचं लक्षण असू शकतं; मात्र अडचणीच्या वेळी आपल्या सोबत उभे राहणारे आणि आपण ज्यांच्यासाठी उभे राहू शकतो अशी माणसं असणं ही खरी संपत्ती आहे.

म्हणून सोशल मीडिया वापरू नये असा प्रश्नच नाही. उलट त्याचा अधिक सकारात्मक आणि जबाबदार वापर करण्याची गरज आहे. चांगले विचार शेअर करूया, उपयुक्त माहिती पोहोचवूया, सामाजिक उपक्रमांना प्रसिद्धी देऊया आणि लोकांना जोडूया. पण त्याच वेळी स्क्रीनच्या बाहेरही जगूया. आपल्या कुटुंबासाठी वेळ देऊया, मित्रांना भेटूया, शेजाऱ्यांशी संवाद साधूया, समाजाच्या प्रश्नांमध्ये सहभागी होऊया आणि गरजेच्या वेळी माणसांच्या पाठीशी उभे राहूया.

कारण सोशल मीडियावर दिसणं ही डिजिटल उपस्थिती आहे; पण माणसांच्या आयुष्यात जाणवणं ही खरी सामाजिकता आहे.

आपल्या पोस्टवर किती लाईक्स मिळतात यापेक्षा आपल्या कृतीमुळे किती माणसांच्या चेहऱ्यावर समाधान येतं, हे अधिक महत्त्वाचं आहे. किती लोक आपल्याला फॉलो करतात यापेक्षा किती लोक आपल्यावर विश्वास ठेवतात, हे महत्त्वाचं आहे. किती लोक आपल्या पोस्ट शेअर करतात यापेक्षा आपण समाजासाठी काय शेअर करतो-आपला वेळ, ज्ञान, कौशल्य आणि संवेदना-हे अधिक महत्त्वाचं आहे.

म्हणून प्रश्न फक्त एवढाच नाही की 'तुम्ही सोशल मीडियावर आहात का?' खरा प्रश्न आहे-'तुम्ही सोशल आहात का?'

सोशल मीडियावर नक्की राहूया; पण



त्यापलीकडेही माणसांशी जोडलेले राहूया. कारण डिजिटल जगात आपली उपस्थिती दिसते; पण समाजात केलेली आपली कृती लक्षात राहते.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे देशभरात एक महिन्याचे सेवा संकल्प अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाने (भाजप) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १% सप्टेंबर रोजी देशभरात एक महिनाभर चालणाऱ्या सेवा संकल्प अभियाना'ची घोषणा केली आहे. एक महिन्याच्या या महाअभियानांतर्गत सेवा पंधरवडा, सेवेत माझे योगदान, सेवा सेतू अभियान, राष्ट्रीय इनोव्हेशन चॅलेंज यांसारखे विविध कार्यक्रम राज्यस्तरापासून ते बूथ स्तरापर्यंत आयोजित केले जातील.

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि खासदार विनोद तावडे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, नवीन राष्ट्रीय टीमच्या गठनानंतर राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची पहिली बैठक झाली. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष, संघटन महामंत्री आणि राज्यस्तरीय टीमसोबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये आगामी अभियानाच्या तयारीवर चर्चा करण्यात आली. तावडे यांनी सांगितले की, भाजप दरवर्षी १% सप्टेंबर रोजी पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सेवा पंधरवडा' आयोजित करते. यावर्षी % ऑक्टोबर रोजी पंतप्रधान मोदी यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या दोन्ही प्रसंगांचा विचार करून पक्षाने एक महिनाभर चालणारे राष्ट्रव्यापी सेवा संकल्प अभियान' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानांतर्गत देशभरात विविध सेवा आणि जनसंपर्काशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

त्यांनी सांगितले की, सेवा संकल्प अभियानांतर्गत यावेळी अंगणवाडीत काम करणाऱ्या मातांचा त्यांच्या सामाजिक कार्यासाठी सन्मान करण्यात येणार आहे. अंगणवाडी सेविका समाजात योजनांची अंमलबजावणी तळागाळापर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या कार्यक्रमांतर्गत सर्व अंगणवाडी कार्यकर्त्यांसाठी विशेष आयोजन करण्यात येणार आहे. याअंतर्गत भाजप १४ लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रांपर्यंत पोहोचणार असून, तेथे कार्यरत महिलांचा त्यांच्या सेवेबद्दल सन्मान केला जाणार आहे.

विनोद तावडे यांनी सांगितले की, याच अभियानांतर्गत सेवेत माझे योगदान' हा कार्यक्रमही राबवला जाणार आहे. याअंतर्गत तरुणांसह लोकांना आवाहन केले जाईल की त्यांनी सेवा करताना कोणतीही रील बनवावी आणि ती सोशल मीडियावर शेअर करावी. सेवा कार्यांमध्ये स्वच्छता, टीबी निर्मूलन यांसारख्या कोणत्याही सेवा कार्याबाबत कार्यकर्ते लोकांना प्रेरित करतील की त्यांनी त्याची रील बनवून प्रसारित करावी. त्यांनी सांगितले की, महाअभियानांतर्गत सेवा सेतू अभियान'ही राबवले जाणार आहे, ज्यामध्ये सरकारी योजनांपासून आतापर्यंत वंचित राहिलेल्या पात्र व्यक्तींची ओळख करून त्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत केली जाईल. यासाठी लोक आवश्यक कागदपत्रांसह ब्लॉक स्तरावर पोहोचून अर्ज करू शकतील.

यासोबतच राष्ट्रीय इनोव्हेशन चॅलेंजही आयोजित करण्यात येणार आहे, ज्यामध्ये तरुणांसाठी संशोधन कार्याशी संबंधित स्पर्धा आयोजित केल्या जातील. या स्पर्धा बूथ, ब्लॉक, जिल्हा आणि प्रदेश स्तरावर आयोजित केल्या जातील. त्यांनी सांगितले की, आज यासंदर्भात राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. येत्या एका आठवड्यात या अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रदेश, जिल्हा आणि ब्लॉक स्तरावर कार्यशाळा आयोजित केली जाईल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# परिस्थिती कितीही कठीण असो, मनातील जिद्द मोठी असेल तर यशाचा मार्ग नक्की सापडतो

## पंचायत समिती अक्कलकोट उपसभापती सागर कल्याणशेट्टी; हालहळ्ळी (अ ) येथे उज्ज्वल यश संपादन केलेल्या सत्कारमुर्तींचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अपयश हे शेवट नसून नव्या प्रयत्नांची सुरुवात असते. प्रत्येक चूक आपल्याला काहीतरी शिकवते आणि प्रत्येक अडचण आपल्याला अधिक सक्षम बनवते. नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन आणि सकारात्मक विचाराच्या जोरावरच कोणतेही ध्येय सहज साध्य करता येत असल्याचे मत अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांनी येते बोलताना व्यक्त केले.




अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी (अ ) येथे उज्ज्वल यश संपादन केलेल्या सत्कारमुर्तींचा सन्मान सोहळा ग्रामपंचायत व समस्थ ग्रामस्थ हालहळ्ळी (अ) यांच्या वतीने भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना उपसभापती सागर कल्याणशेट्टी हे बोलत होते.

यावेळी मातोश्री सरस्वती बाबुराव चाकोते विद्यालय सोलापूर येथे प्रशालेचे मुख्याध्यापकपदी मारूती बिराजदार यांचा निवड झाल्याबद्दल आणी ज्यांनी स्वतःच व आपल्या हालहळ्ळी अ गावाचे नाव आज देशाच्या नकाशावर सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. अशा या मातीतील सुपूत्र प्रविण स्वामी यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या(णझडउ)परीक्षेत अखिल भारतीय २७९ वा क्रमांक पटकावून आयपीएस अधिकारी होण्याचा मान मिळविला आहे.व णझडउ उझक्र (सहाय्यक कमांडंट) या पदावर प्रवीण स्वामींनी विराजमान झाल्याने त्यांच्या सत्कार करण्यात आला. व शिलवंती राजमाने ह्यांनी चझडउ परिक्षेत पास होऊन जलसंधारण अधिकारी पदावर विराजमान झाले व जिल्हा सत्र न्यायालयात लिपीकपदी सचिन ढब्बे यांचा निवड झाल्याबद्दल तर पुणे कारागृहात पोलिसपदी

संगिता वळदड्डे आणी म.रा.प.म चालक तथा वाहक म्हणून राहुल रसनभैरे यांचा निवड झाल्याबद्दल अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती सागर कल्याणशेट्टी व मान्यवरांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर पंचायत समितीचे माजी सभापती तथा विद्यमान सदस्या विमल गव्हाणे,निवृत्त ज्येष्ठ शिक्षिका सुभद्राबाई अकतनाळ,चपळगावचे सरपंच वर्षा भंडारकवठे, समाजसेवक सिध्दराम भंडारकवठे,किणीचे उपसरपंच तथा भाजपा मंडल अध्यक्ष अमोल हिप्परगे, हालहळ्ळी(अ) चे माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य निलप्पा बिराजदार, ग्रामसेविका सुरेखा सरवळे, निवृत्त ग्रामविकास अधिकारी श्रीशैल स्वामी,शिवनिंगप्पा वंगे,निवृत्त प्राध्यापक तथा श्री रामलिंगेश्वर प्रशाला, तीर्थचे चेअरमन डॉ.भिमाशंकर बिराजदार,माजी सरपंच विश्वनाथ दोड्याळे, पोलिस पाटील मल्लिकार्जुन बिराजदार,इंजिनिअर शशिकांत स्वामी,डॉक्टर मल्लिनाथ स्वामी आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना उपसभापती सागर कल्याणशेट्टी म्हणाले की, जीवनात कितीही अडथळे आले तरी प्रयत्न सोडू नयेत. कारण सातत्याने केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांना यश एक ना एक दिवस नक्कीच मिळत असल्याचे सांगितले.

यावेळी सत्कारमूर्ती प्रविण स्वामी, मारुती बिराजदार, शिलवंती राजमाने,सचिन ढब्बे यांनी या पदापर्यंत पोहोचताना काय काय अनंत अडचणी आल्या ते मनोगतातून व्यक्त केले.व आपल्या गावचा ऋणी कायम हृदयात असणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी सुभद्राबाई अकतनाळ, सिध्दाराम भंडारकवठे, अमोल हिपरगे, भिमाशंकर बिराजदार,शंभुलिंग अकतनाळ आदींनी आपले विचार मांडले. यावेळी हालहळ्ळी अ ग्रामपंचायतच्या वतीने गावातील काही विविध अडचणी संदर्भात उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांना ग्रामपंचायतीच्या वतीने कामाच्या मागणीचे लेखी निवेदन देण्यात आले.

या कार्यक्रमास मार्डी महात्मा फुले प्रशालेचे पर्यवेक्षक गंगाधर राजमाने, सुभाष ढब्बे, चंद्रकांत स्वामी, यशवंत इंगळे, शंभुलिंग अकतनाळ, वीरेश कोन्हाळे, गुरुनाथ गोविंदे, राजकुमार बिराजदार, गंगाधर वळदड्डे, अनिल स्वामी, श्रीशैल बिराजदार, रामण्णा बोराळे,भोजराया पाटील, सिध्दाराम बिराजदार,नागय्या स्वामी,भुजय्या स्वामी, बसवराज बन्ने गुरुजी, स्वामीनाथ परशेट्टी, बापूराव गोविंदे , गौरीशंकर दोड्याळे,रमेश परशेट्टी, महंमद नदाफ यांच्या सह हालहळ्ळी(अ), चपळगाववाडी, चपळगाव, तीर्थ ,कर्जाळ, कोन्हाळी,सोलापूर यासह आदी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त हालहळ्ळी(अ) करांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय समाज पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त अक्कलकोट येथे बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : राष्ट्रीय समाज पक्षाचा येत्या २९ ऑगस्ट २०२६ रोजी २३ वा वर्धापन दिन सोहळा पुणे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन, गंजपेठ पुणे येथे आयोजित केले आहे. त्यानिमित्ताने आज राष्ट्रीय समाज पक्ष अक्कलकोट शहर व तालुका कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ नाना शेवते उपस्थित होते. यावेळी त्यांच्या समवेत पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अनिल शेंडगे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य परमेश्वर पुजारी उपस्थित होते. प्रथमतः अक्कलकोट शहर व तालुका कार्यकारिणीच्या वतीने राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष काशिनाथ नाना शेवते यांचा सत्कार अक्कलकोट तालुका संघटक गुणवंत लवटे यांच्या हस्ते करण्यात आले. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अनिल शेंडगे यांचा सत्कार अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष विलास पाटील,तर प्रदेश कार्यकारिणी सदस्य परमेश्वर पुजारी यांचा सत्कार अक्कलकोट तालुका युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष संतोष शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर , अक्कलकोट तालुका युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष संतोष शिंदे, अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष विलास पाटील,अक्कलकोट तालुका वाहतूक विभाग आघाडीचे तालुका उपाध्यक्ष बिरप्पा मैंदर्गी, देवराव बंदिछोडे,संतोष बनसोडे, तुळशीराम माडकर, अवधुत फुलारे, श्रीशैल दिवटे, यासीन शेख, सलीम आवटी यांच्या सह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेश अध्यक्ष काशिनाथ नाना शेवते म्हणाले की येत्या शनिवारी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय समाज पक्षाचा २३ वा वर्धापन दिन सोहळा पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे तरी अक्कलकोट तालुक्यातील महादेवजी जानकर साहेब यांच्या वर प्रेम करणारे सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले. आणि येणारा काळ हा राष्ट्रीय समाज पक्षाचा असणार आहे. कारण सध्या देशात भाजपाच्या विरोधात वातावरण निर्माण झाले आहे. जनतेच्या प्रश्नावर आपण आवाज उठवला पाहिजे आणि त्यांना न्याय देण्यासाठी प्रसंगी मोर्चा, आंदोलन, उपोषणाला बसले पाहिजे तरच भाजपाला सत्तेतून पायउतार व्हायला वेळ लागणार नाही. महादेवजी जानकर साहेब हे त्यागी नेतृत्व आहे. गेल्या चाळीस वर्षापासून ते अविरतपणे बहुजन समाजातील उपेक्षित घटकांना अपेक्षित ठिकाणी नेण्यासाठी आपल्या देहाचा अग्निकुंड केला आहे. सर्व सामान्य गरीब कुटुंबातील मुले पंचायत समिती, जिल्हा परिषद, आमदार, खासदार, मंत्री,व्हावे यासाठी राष्ट्रीय समाज पक्षाची स्थापना केली आहे. तरी आपण तन, मन, धन देऊन महादेवजी जानकर साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पुणे येथील वर्धापनदिन सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन शेवते यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन अक्कलकोट तालुका युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष संतोष शिंदे यांनी केले.

## स्वेरी पॉलीटेक्निकमध्ये सायबर पोलिसांच्या वतीने मार्गदर्शन सत्र संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन व सायबर शाखा, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलीटेक्निक) मध्ये महिला सुरक्षा, सायबर सुरक्षा, वाहतूक सुरक्षा तसेच अमली पदार्थ सेवन प्रतिबंध व जनजागृती या विषयांवर मार्गदर्शन सत्र उत्साहात संपन्न झाले. यासाठी डिप्लोमातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सोशल मिडिया, फेसबुक, इंस्टाग्रामच्या पेजवरून मोबाईलच्या माध्यमातून दररोज फसवणूकीचे प्रकार घडत आहेत. यातून गुन्हेगारी वाढीस लागल्याचे चित्र मिळत आहे. ज्या वयात हातात वह्या पुस्तके हवीत त्या वयात मोबाईल हातात आल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रचंड वेळ खर्ची पडत आहे. फायदा तर काहीच नाही पण यातून गुन्हेगारी हळूहळू फोफावत चालल्याचे दिसुन येते. याच पार्श्वभूमीवर सायबर शाखा, सोलापूर येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांनी सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, डिजिटल सुरक्षितता आणि सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त स च पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी गोसावी यांनी 'महिला सुरक्षा व वाहतूक नियमांचे पालन' याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. पोलीस उपनिरीक्षक केशव रणदिवे यांनी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम, त्यावरील प्रतिबंध आणि युवकांची जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. एकुणच तिघाही पोलीस अधिकाऱ्यांनी सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, डिजिटल सुरक्षितता आणि सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, 'महिला सुरक्षा व वाहतूक नियमांचे पालन' आणि अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम, त्यावरील प्रतिबंध आणि युवकांची जबाबदारी या महत्वाच्या विषयावर स्वेरीत जनजागृती केली. यावेळी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार तसेच डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ यांच्यासह डिप्लोमा इंजिनिअरिंगचे विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या मार्गदर्शन सत्राला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध विषयांवर प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षा, कायद्याचे पालन आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने हे मार्गदर्शन सत्र अत्यंत उपयुक्त ठरले. प्रा.सागर घोडके यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

**समाजहितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार प्रदान**

## युवा रत्न समाजभूषण जीवनगौरव पुरस्काराने सन्मान!







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माळशिरस : शिव मल्हार गड, भोर यांच्या वतीने दरवर्षी सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात येतो. यावर्षी 'युवा रत्न समाजभूषण जीवनगौरव पुरस्कार' माळशिरस तालुक्याचे कर्तव्यदक्ष सभापती मा. श्री. दत्तात्रय रावसाहेब मगर यांना प्रदान करण्यात आला.

सामाजिक क्षेत्रात सातत्याने केलेले उल्लेखनीय कार्य, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी असलेली बांधिलकी, विकासकामांचा पाठपुरावा आणि समाजहितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार म्हणजे केवळ सन्मान नसून, आजवर केलेल्या कार्याला मिळालेली समाजमान्यतेची पावती आणि भविष्यात आणखी जोमाने जनसेवा करण्याची प्रेरणा आहे.

या पुरस्कार सोहळ्यास मा.श्री.केशवजी उपाध्ये,संत तुकाराम महाराजांचे अकरावे वंशज ह.भ.प.सोहम महाराज देवकर, शिव मल्हार गडाचे महंत प्रा.मार्तंड साठे सर, लोकप्रिय व्याख्याते विक्रमसिंह मगर सर, विद्यार्थी काँग्रेस महासचिव कृष्णा साठे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# लोकशाही न्यूजचे निर्भीड पत्रकार चंद्रशेखर भांगे यांना अक्कलकोट रत्न पुरस्काराने सन्मानित

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण; पुण्यात अक्कलकोटच्या कर्तृत्ववानांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : अक्कलकोट तालुक्याशी नाळ जोडलेली असतानाच पुणे शहरात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून अक्कलकोटचे नाव उज्वल करणाऱ्या कर्तृत्ववानांचा गौरव पुण्यात करण्यात आला. गावगाथा मीडिया नेटवर्कच्या वतीने आयोजित 'अक्कलकोट भूषण व रत्न पुरस्कार सोहळा २०२६' शनिवारी नितू मांडके सभागृह, स्वारगेट येथे उत्साहात पार पडला. अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.







या सोहळ्यात सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, कला, उद्योग, प्रशासन, पोलीस, न्यायव्यवस्था आणि अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या एकूण १५ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

**चार मान्यवरांना अक्कलकोट भूषण**

अक्कलकोट भूषण पुरस्काराने जन्मेजयराजे भोसले महाराज, मल्लिनाथ कलशेट्टी, माधव राजगुरू आणि शरणकुमार लिंबाळे यांचा गौरव करण्यात आला.

तर अक्कलकोट रत्न पुरस्काराने पौर्णिमाताई गायकवाड (आयपीएस), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा न्यायाधीश, पुणे), महेश बोळकोटगी (वरिष्ठ पोलीस निरीक्षक), रविकांत पाटील (सहकार व साखर उद्योग), विरभद्र हारकूड (संस्थापक अध्यक्ष, अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघ), गणेश फुलारी (उद्योजक), संजीवकुमार हिळ्ळी (छायाचित्रणकार), चंद्रशेखर भांगे (पत्रकार, लोकशाही न्यूज), सिद्धार्थ कापसे (युवा उद्योजक), डॉ. अमोगसिद्ध चेंडके (मराठी भाषा व संतसाहित्य अभ्यासक) आणि ॲड. सदाशिव माळगे (शैक्षणिक व सामाजिक क्षेत्र) यांचा सन्मान करण्यात आला.

**'दरवर्षी पुरस्कार सोहळा घेणार'**

गावगाथा मीडिया नेटवर्कचे मुख्य संपादक धोंडप्पा नंदे म्हणाले, नोकरी-व्यवसायानिमित्त पुण्यात वास्तव्यास असलो तरी आमची नाळ अक्कलकोटच्या मातीशी घट्ट जोडलेली आहे. पुण्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अक्कलकोटच्या भूमिपुत्रांचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे आणि मनोबल वाढावे, या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला आहे. यापुढे दरवर्षी हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येईल.

**'समतेचा शिल्पकार महात्मा बसवेश्वर'चे प्रकाशन**

सोहळ्यात प्रा. सदाशिव माळगे लिखित 'समतेचा शिल्पकार महात्मा बसवेश्वर' या पुस्तकाचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. महात्मा बसवेश्वर यांच्या समता, मानवता आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांवर प्रकाश टाकणाऱ्या या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे कार्यक्रमाला वैचारिक अधिष्ठान लाभले.

उपक्रमाचे आमदारांकडून कौतुक

आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी गावगाथा मीडिया नेटवर्कच्या उपक्रमाचे कौतुक केले. पुण्यात नोकरी-व्यवसायासाठी स्थायिक झाल्यानंतरही अक्कलकोटच्या जनतेशी नाते कायम ठेवून तालुक्यातील कर्तृत्ववानांना एका व्यासपीठावर आणण्याचे काम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. धोंडप्पा नंदे यांच्या माध्यमातून अक्कलकोट तालुक्यातील अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वे आणि उत्साही तालुकावासीयांना भेटता आले, हे माझे भाग्य आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या पुरस्कार सोहळ्यामुळे पुण्यात वास्तव्यास असलेल्या अक्कलकोट तालुक्यातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींना एकत्र येण्याची आणि एकमेकांच्या कार्याची ओळख होण्याची संधी मिळाली. अक्कलकोटपासून दूर राहूनही आपल्या कार्यातून तालुक्याचे नाव उज्वल करणाऱ्या व्यक्तींच्या सन्मानाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कल्याणराव मंठाळे, सोमेश्वर वाडी, डॉ. अमोगसिद्ध चेंडके, स्वामी चांगुले, संतोष राठोडे, प्रा. सदाशिव माळगे, अंबादास गवंडी आणि राहुल भंडारी यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामागील संकल्पना, पुढाकार आणि अक्कलकोटकरांना एका व्यासपीठावर आणण्याची भूमिका गावगाथा मीडिया नेटवर्कचे मुख्य संपादक धोंडप्पा नंदे यांची होती. यापुढेही अक्कलकोटच्या कर्तृत्ववान भूमिपुत्रांचा गौरव करण्याची परंपरा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# बोगस ठरावांच्या आधारे मतदार यादी: आमदार सुभाष (बापू) देशमुख यांची चौकशीची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : बार्शी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय वातावरण चांगले तापले आहे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमध्ये कधी त्रित्या बोगस ठराव मंजूर करून गैरमार्गाने मतदार यादी तयार केली जात असल्याची गंभीर आरोप करण्यात आले आहे या प्रकरणाची प्रशासनाने तातडीने चौकशी करून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी मागणी आमदार सुभाष बापू देशमुख यांनी केली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमध्ये नेमबाह्य पद्धतीने ठराव घेण्यात येत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. संस्थेच्या सभासद व संचालकांना विश्वासात न घेता प्रोसिडिंग बुकवर सह्या घेण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप आहे तसेच संस्थेच्या अधिकृत कार्यालय बाहेर ठराव घेण्यासह इतर अनियमितता होत असल्याचेही तक्रार नमूद करण्यात आले आहे या प्रकरणामुळे संस्थेच्या सभासदाचा. अधिकारावर गदा येण्याची शक्यता असून सहकार क्षेत्रातील लोकशाही मूल्यांनाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे, कठीत बोगस ठरावाच्या आधारे मतदार यादी पात्र सभासद व संचालकावर अन्याय होण्याची शक्यता आहे, त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या निष्पक्ष तेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले झाले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तातडीने संपूर्ण प्रकाराची चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी असे कोणतेही ठराव बोगस करून मतदार यादी तयार होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशी दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा श्री सुभाष बापू देशमुख यांनी केली आहे.

### औसेकर महाराज परिवारास मातृशोक

# श्रीमती लिलाबाई ज्ञानेश्वर महाराज यांना देवाज्ञा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लातूर : श्री समर्थ सच्चिदानंद सद्गुरु वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थान श्रीक्षेत्र औसाचे ४ थे पिठाधीपती सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या धर्मपत्नी आणि विद्यमान पीठाधिपती सद्गुरु श्री गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या मातोश्री श्रीमती लिलाबाई ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांना हैदराबाद येथे त्यांच्या आशीर्वाद निवासस्थानी शनिवार दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ७.५० वाजता देवाज्ञा झाली.

रविवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता औसा येथील पाराबाई येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील श्रीमती लिलाबाई आईसाहेब यांच्या पश्चात श्री गोरखनाथ महाराज श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सह अध्यक्ष श्री सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर, श्री बसवंतराव देशमुख चिडगोपा, हे तीन सुपुत्र, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.

आईसाहेबांच्या जाण्याने औसेकर महाराज परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संस्थांन च्या लाखो शिष्य शोक सागरात बुडाला आहे.

# वैनतेय विद्यालयात पालक सभा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : निफाड येथील वैनतेय विद्यालयात पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते पालक-विद्यार्थी समुपदेशन या. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास साधण्यासाठी शाळा आणि पालक यांच्यात सुसंवाद असणे आवश्यक आहे, या उद्देशाने ही पालक सभा घेण्यात आली.

या पालक सभेत विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, शालेय पोषण आहार, आरोग्य, शिस्त, स्वच्छता आणि विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे होते. यावेळी संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले, विश्वस्त ॲड. दिलीप वाघवकर, मधुकर राऊत, विश्वास कराड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुजीत कोशीरे, माजी नगराध्यक्षा कांताबाई कर्डिले, प्राचार्या मनिषा गुजराथी, पर्यवेक्षक चंद्रकांत जाधव ,पर्यवेक्षक बाळासाहेब गुंजाळ, पालक संघाचे उपाध्यक्ष डॉ. प्रा. महेश बनकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कराड, उपाध्यक्षा अनुराधा कुंदे यांच्यासह शिक्षक व पालक उपस्थित होते.

या सभेचे प्रास्ताविक बाळासाहेब गुंजाळ यांनी केले.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुजीत कोशीरे यांनी किशोरवयीन मुलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन करतांना सांगितले की किशोरावस्थेतील शारीरिक व मानसिक बदल, संतुलित आहार, वैयक्तिक स्वच्छता, व्यायाम आणि मानसिक आरोग्य याबाबत त्यांनी माहिती दिली व पालकांनी मुलांशी मोकळेपणाने संवाद साधावा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पालकांनी विविध प्रश्न व सूचना मांडल्या, त्यांचे निरसन कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे यांनी केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शाळा, शिक्षक आणि पालकांनी एकत्रित काम करण्याचे आवाहन केले. संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले यांनी संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

प्राचार्या मनिषा गुजराथी यांचे भाषण झाले यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुजित कोशिरे, वि.दा.व्यवहारे रतन पाटील वडघुले, प्राचार्या मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक बाळासाहेब गुंजाळ यांची भाषणे झाली

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रशीद पठाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन तुकाराम तरवारे यांनी केले पसायदानाने सभेची सांगता झाली.

### राजेश दमाणी यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

### एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीमध्ये 'विश्वारंभ' इंडक्शन समारंभ उत्साहात संपन्न

# जिज्ञासू आणि नम्र राहून सतत शिकत राहा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आयुष्यात यशस्वी होण्यासाठी संस्कारांची 'मुळे' घट्ट असणे आणि स्वप्नांचे 'पंख' पसरून उंच भरारी घेणे आवश्यक आहे. सतत शिकण्याची भूक ठेवा आणि नम्र राहा. तुमच्यात शिकण्याची वृत्ती जिवंत असेपर्यंत तुमची प्रगती कोणीही रोखू शकत नाही. असे विचार सोलापुरातील प्रसिद्ध उद्योगपती व समाजसेवक आणि जामश्री रियल्टीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश दमाणी यांनी विद्यार्थी आणि पालकांना संबोधित करताना मांडले. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये नवीन शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'विश्वारंभ २०२६' या इंडक्शन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शुभाशीर्वादाने आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी राजेश दमाणी, जामश्री रियल्टीचे उपाध्यक्ष अंकित दमाणी, विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. गोपळकृष्ण जोशी, कुलसचिव प्राणेश मुरनाळ, प्रा. अनंत चक्रदेव, रजिस्टार (इव्हॅल्युएशन अँड असेसमेंट) प्रा. प्रभा कासलीवाल आणि विविध शाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते.

विद्यापीठातील प्रयोगशाळा आणि डिझाइन सेंटरचे कौतुक करताना राजेश दमाणी पुढे म्हणाले की, केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिक शिक्षणावर भर द्यावा, चुकांना न घाबरता त्या प्रगतीच्या पायऱ्या बनवाव्यात आणि दररोज स्क्रीन टाईम कमी करून पुस्तकांचे वाचन करावे. असे आहावन त्यांनी विद्यार्थ्यांना केले

माईर्स एमआयटीच्या मूल्याधिष्ठित शैक्षणिक परंपरेचा उल्लेख करत कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न धावता नवनिर्मिती, कौशल्य विकास आणि समस्या निवारणावर भर देऊन आयुष्याच्या परीक्षेसाठी स्वतःला तयार करावे. विद्यापीठाची तुलना गंगेच्या प्रवाहाशी करताना ते म्हणाले, शिकण्याची भूक आणि अभ्यासाची प्रेरणा ही तुमची पात्र आहेत, ती घेऊनच तुम्हाला ज्ञानरूपी गंगेत उतरावे लागेल. या वेळी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ आणि पालकांनी एकत्रितपणे काम करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. पालकांनी विद्यापीठाच्या संपर्कात राहण्यासोबतच आपल्या पाल्याशी दररोज संवाद साधावा, असे आहावन त्यांनी पालकांना केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अंकित दमाणी यांनी जामश्री ग्रुपच्या प्रवासावर आणि काळानुरूप झालेल्या परिवर्तनावर प्रकाश टाकला. त्यानंतर विद्यापीठाचे कुलसचिव प्राणेश मुरनाळ यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांना विद्यापीठाची तत्त्वे, मूल्यव्यवस्था, शैक्षणिक दृष्टिकोन आणि उपलब्ध विविध संधींची माहिती दिली. नवीन शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठात उत्साहात स्वागत करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला विद्यापीठाच प्राध्यापक, नवप्रविष्ट विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.